## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-
१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक दिनांक ०२/०४/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२५/२०१२/जा.१९९, दिनांक ०२/०४/२०१२.
३) या कार्यालयाचे "आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२५/२०१२/जा.२७८, दिनांक ३०/०४/२०१२.
४) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र. ९४६९/२०१२ अन्वये पारीत केलेले आदेश.
५) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२५/२०१२/जा.९०६, दिनांक १५/१२/२०१२, ०५/०१/२०१३, २३/०१/२०१३ व ३१/०१/२०१३.
६) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांचे दिनांक ०२/०१/२०१३ रोजीचे टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.
७) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दि. ०५/०१/२०१३ रोजीचे टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.
८) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांचे दिनांक २३/०१/२०१३ रोजीचे लेखी निवेदन.
९) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दिनांक २४/०१/२०१३ व २८/०१/२०१३ रोजी फॅक्स संदेशाद्वारे प्राप्त निवेदने.
१०) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दि. २९/०१/२०१३ रोजीचे निवेदन.
११) मे. एस. रामदास प्रागजी फॉरवर्डस प्रा.लि. यांचे दि. २९/०१/२०१३ रोजीचे निवेदन.
१२) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दि. ०४/०२/२०१३ रोजीचे निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२५/२०१२/जा. ३८३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २८/२ /२०१३.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २९/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ

डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे भेट देऊन तपासणी केली असता, नमुद वेअरहाऊसमधील गोदाम क्र. २, ६ व ८ या तीनही गोदामात मोठ्या प्रमाणावर कडधान्याचा साठा साठवणूक केल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी सदर कडधान्याच्या साठवणूकीकरिता शिधावाटप यंत्रणेचा, अन्न व औषध प्रशासन विभागाचा अथवा संबंधित महानगरपालिका यांच्याकडून आवश्यक असणारा परवाना सादर करण्याच्या सुचना दिल्या असता उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांनी संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक परवाना प्राप्त करुन न घेतल्याचे सांगून त्याकरिता अर्जही केला नसल्याचे सांगून सदरचा कडधान्याचा साठा हा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या मालकीचा असल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदरचा साठा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या मालकीचा असल्यास साठा संबंधिचे कागदपत्र, सदर साठवणूकीकरिता मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन सोबतचा करारनामा व सदर कडधान्याच्या साठ्याचे साठवणुकीचे दिनांक व इतर तपशिल असलेले साठापुस्तक सादर करण्यास सांगितले असता, उपस्थित व्यवस्थापक यांनी सदर कडधान्याचा साठा हा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन यांनी आयात केल्याचे सांगून सद्य:स्थितीत त्यांच्याकडे याबाबतचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगितले. तसेच मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन सोबत कडधान्य साठवणूकीसाठी कोणताही करारनामा केला नसल्याचे सांगून त्यांच्याकडे साठापुस्तक व साठवणुकीचे दिनांक सहित तपशिलही उपलब्ध नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी उपरोक्त बाब गंभीर असल्याचे व साठवणूक केलेला कडधान्याचा साठा हा विनाखरेदी बिलांचा अथवा विना परवाना असल्याचे उपस्थित व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणून दिली व सदर कडधान्याचा साठा आयात केला असल्यास आयात संबंधिचे बिल ऑफ एन्ट्री व केंद्रशासनाने तसेच महाराष्ट्र शासनाने निर्देशित केल्यानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या कार्यालयात सादर करण्यात आलेल्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत सादर करण्यास सुचित केले. तद्नंतर उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांनी दुरध्वनीवरुन संपर्क साधून बिल ऑफ एन्ट्रीच्या प्रती फॅक्स संदेशद्वारे त्यांच्या कार्यालयात प्राप्त करुन अधिकाऱ्यांना सादर केल्या व मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगून सदरचे विवरणपत्र त्यांनी संबंधित प्राधिकरणास सादर केले आहे किंवा कसे, याबाबत त्यांना अवगत नसल्याचे सांगितले. सदर कडधान्याच्या साठ्याचे मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे व्यवस्थापक महेश द्वारकानाथ राठी व पंचांसमक्ष अधिकाऱ्यांनी कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या मदतीने प्रत्यक्षात मोजदाद केली असता, गोदाम क्र. २ मधील काळे उडिदचा २३४.१०० मे. टन, गोदाम क्र. ६ मधील मसूरचा ५७५.२०० मे. टन तसेच गोदाम क्र. ८ मधील हिरवे मुगचा ४८५.००० मे. टन असे मिळून एकूण २५८८६ बाचक्यांमधील १२९४.३०० मे. टन कडधान्याचा साठा आढळून आला.

उपरोक्त नमूद बिल ऑफ एन्ट्रीमधील आयात केलेल्या नमूद साठ्याचे प्रत्यक्षात अधिकाऱ्यांनी पंच व कंपनीचे व्यवस्थापक यांच्या समक्ष गोदाम क्रमांक २, ६ व ८ मधील मोजदाद करण्यात आलेल्या कडधान्याच्या



0002

CONTROLLER OF RATIONING

साठ्याशी तुलनात्मक पडताळणी केली असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक आढळून आला. सदर फरकाबाबत उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांना अधिक विचारणा केली असता, त्यांनी समाधानकारक उत्तरे न देता सदर साठ्याचा त्यांचा संबंध नसल्याचे सांगून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. अधिकाऱ्यांनी बिल ऑफ एन्ट्रीवरील काळे उडिदचा साठा दिनांक ०८/१२/२०११ रोजी १४०० बाचक्यांमधील ११९.४३० मे. टन नमूद असल्याचे व प्रत्यक्षात गोदामामध्ये ४६८२ बाचक्यांमध्ये २३४.१०० मे. टन साठवणूक असल्याचे, बिल ऑफ एन्ट्रीवरील मसुर हा कडधान्याचा साठा दिनांक २९/०१/२०१० रोजी सुटा असलेला १९६.६५० मे. टन नमूद असल्याचे व प्रत्यक्षात गोदामामध्ये ११५०४ बाचक्यांमध्ये ५७५.२०० मे. टन साठवणूक असल्याचे तसेच बिल ऑफ एन्ट्रीवरील हिरवे मुग हा कडधान्याचा साठा दिनांक २३/०९/२०१० रोजी ४८०० बाचक्यांमधील २४०.३८४ मे. टन नमूद असल्याचे व प्रत्यक्षात गोदामामध्ये ९७०० बाचक्यांमध्ये ४८५.००० मे. टन साठवणूक असल्याचे उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांना पंचांसमक्ष निदर्शनास आणून दिले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष काळे उडिदचा ३२८२ बाचक्यांमधील ११४.६७ मे. टन, मसुरचा ३७८.५५ मे. टन तसेच हिरवे मुगचा ४९०० बाचक्यांमधील २४४.६१६ मे. टन हा सर्व साठा आयात केलेल्या बिल ऑफ एन्ट्री वरील नमूद साठ्यापेक्षा अतिरिक्त असल्याचे उपस्थित व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणून देऊन याबाबत त्यांना सदरचा साठवणूक केलेला कडधान्याचा साठा हा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या मालकीचा असल्यास त्यापैकी मसुरचा साठा हा गेले २६ महिने तसेच हिरवे मुगचा साठा हा गेले सुमारे १८ महिने साठवणूक करण्याचे प्रयोजन काय व अतिरिक्त आढळून आलेला कडधान्याचा साठा हा कोणाच्या मालकीचा आहे ? याबाबत उपस्थित व्यवस्थापक यांना पंचांसमक्ष विचारणा केली असता, त्यांनी मोघम स्वरुपाचे असमाधानकारक विधाने करुन अधिकाऱ्यांचा जाणीवपूर्वक दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या नमूद पत्त्यावरील गोदाम क्र. २, ६ व ८ मध्ये साठवणूक केलेल्या साठ्यापैकी व बिल ऑफ एन्ट्री वरील नमूद साठ्यापेक्षा अतिरिक्त आढळून आलेल्या साठ्याबाबत उपस्थित व्यवस्थापक महेश द्वारकानाथ राठी यांनी सदरचा साठा हा त्यांच्या गोदामात सुमारे गेले २६ महिन्यांपासून साठवणूक केला असला तरीही सदरच्या साठ्याशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगून याबाबतचा जबाब देण्यास नकार दिला व याबाबतचे परिपूर्ण पुरावादर्शक कागदपत्रे सादर न केल्याने पुढील तपासणीच्या अधिन राहून साठवणूक केलेला कडधान्याचा साठा जागीच जप्त करुन जैसे थे स्थितीत जतन करण्याचे पंचांसमक्ष सुचना दिल्या.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाटीच्या कार्यवाहीकरिता दिनांक २९/०३/२०१२ रोजीच्या तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेला विनापरवाना तसेच विना खरेदी बिलांचा अतिरिक्त आढळून आलेला अवैध असलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ?

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ... BAI

याबाबत सर्व संबंधितांना वाचावे क्र. २ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयात दिनांक ०२/०४/२०१२ व ०९/०४/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. तद्नंतर सर्व संबंधितांनी त्यांचे मौखिक म्हणणे मांडुन त्याअनुषंगाने त्यांनी सादर केलेली लेखी निवेदने व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करुन वाचावे क्र. ३ अन्वये जप्त मुद्देमाल शासन जमा करण्याचे आदेश पारित करण्यात आले.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाकडून पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ९४६९/२०१२ दाखल केले. सदर रिट पिटीशनच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १९/११/२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये शासनास तसेच पर्यायाने या कार्यालयास जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये नव्याने कार्यवाही करण्यास मोकळीक असुन सर्व संबंधितांना जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-ब अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची संधी देण्यात यावी असे नमुद केले आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक, मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे व्यवस्थापक तसेच मे. एस. रामदास प्रागजीचे मालक यांना जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-ब अंतर्गत वाचावे क्र. ५ अन्वये नव्याने कारणे दाखवा नोटीस बजावून सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी दिनांक ०३/०१/२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. तथापी, मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी तसेच मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या वतीने टपालामार्फत सादर केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २३/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली. तद्नंतर सर्व संबंतिधांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली असून त्याकरिता या कार्यालयात पुढील सुनावणी दिनांक २९/०१/२०१३ व ०४/०२/२०१३ रोर्जी ठेवण्यात आली.

उपरोक्त सुनावणीस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे उपमहाव्यवस्थापक श्री. मधुसुदन, मॅनेजर मार्केटिंग श्री. पी.बी. भालदे, सहाय्यक व्यवस्थापक श्री. हर्षद दळणे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ८ अन्वये लेखी निवेदन, वाचावे क्र. १० अन्वये लेखी निवेदन व आयात साठा व वितरण याबाबतचे विवरणपत्र तसेच वाचावे क्र. १२ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच मे. एस. रामदास प्रागजीचे संचालक श्री. चेतन कोटक यांनी उपस्थित राहून लेखी निवेदनासोबत वितरणाचे विवरणपत्र वाचावे क्र. ११ अन्वये सादर केले.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखुन ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने आयात केलेला साठा हा विविध राज्यांच्या मागणी नुसार सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत करावयाचा साठा असल्याचे सांगितले. तथापी, सदर संपूर्ण कालावधीत आयात केलेल्या साठ्यापैकी विविध राज्यांना सार्वजनिक वितरण प्रणालीवर विक्री केल्याचा अभिलेख तसेच इतर खाजगी व्यापाऱ्यांना विक्री केले असल्यास त्याचा अभिलेख सादर न केल्याचे दिसून येते. सबब, सदर ठेवण्यात येणाऱ्या सुनावणीमध्ये वरील नमूद परिपूर्ण आवश्यक असलेले अभिलेख सादर करावे, असे सुचित करण्यात आले.

मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे उपमहाव्यवस्थापक श्री. मधुसुदन, मॅनेजर मार्केटिंग श्री. पी.बी. मालदे, सहाय्यक व्यवस्थापक श्री. हर्षद दळणे यांना दिनांक २३/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस नोटीसमधील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने आयात साठ्याचे सन २००९ पासूनचे आवक व वितरणाबाबतचे तपशिल तसेच सदर सुनावणीस मे. एस. रामदास प्रागजीचे संचालक यांनी नमूद कंपनीचा आयात केलेल्या साठ्याचे कस्टम क्लिअरन्स, साठ्याची उचल व वितरण करीत असल्याचे सांगितले. सदर बाबतचे वर्क ऑर्डर व करारनामा तसेच सन २००९ पासूनचे आवक व वितरणाबाबतचे तपशिल सादर करण्यास सुचित केले असता, सदरची तपशिलवार आकडेवारी सादर करण्यास सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. तसेच मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने उपस्थितास त्यांचा मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीसोबतचा करारनामा सादर करण्यास सुचित केले असता, ते दोन दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले. तसेच मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने सदरचा साठा हा त्यांच्या मालकीचा नसल्याने त्यांचा या साठ्याशी काहीही संबंध नसल्याचे सांगितले. सबब, संबंधितांना वरील नमूद पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी तसेच त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणी दिनांक २९/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

सदर सुनावणीस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे उपमहाव्यवस्थापक श्री. मधुसुदन, मॅनेजर मार्केटिंग श्री. पी.बी. मालदे, सहाय्यक व्यवस्थापक श्री. हर्षद दळणे यांनी उपस्थित राहून आयात साठा व वितरण याबाबतचे विवरणपत्र सादर केले. सदर सुनावणीस मे. एस. रामदास प्रागजीचे संचालक श्री. चेतन कोटक यांनी उपस्थित राहून वितरणाचे विवरणपत्र सादर केले.

मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांच्या वतीने या कार्यालयास दिनांक २७/११/२०१२ रोजी सादर केलेल्या पत्रान्वये त्यांनी जप्त साठ्याच्या विल्हेवाटीकरिता संबंधितांना योग्य त्या सुचना निर्गमित करण्याबाबत विनंती केली. तथापी, सदर प्रकरणी या कार्यालयाकडून आवश्यक सुचना निर्गमित केले नसतानाही त्यांनी जप्त कडधान्यांच्या साठ्याची उचल केल्याचे दिसून येते. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार आवश्यक

बाबींची पुर्तता न करता मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या अधिकाऱ्यांनी माहे डिसेंबर २०१२ या महिन्यात जप्त असलेल्या कडधान्यांच्या साठ्याची उचल केल्याची बाब उपस्थितांना निदर्शनास आणून दिली असता, मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयीन स्तरावर निर्णय घेतल्याची बाब मान्य केली. तथापी, सदर निर्णय घेणारे अधिकारी यांच्या नावाचा उल्लेख केला नाही. तरी सदर निर्णयाची प्रत अथवा त्या संबंधातील कार्यालयीन टिप्पणी संबंधितांना सादर करण्यास सांगितले असता, त्यांनी पुढील सुनावणीस सादर करणार असल्याचे सांगितले.

सदर जप्त साठ्याचे वितरण त्यांनी मे. बालाजी ग्रेन्स, मे. श्री हरी इंटरनॅशनल व मे. एम.पी. ट्रेडिंग कंपनी या खाजगी कंपन्यांना केल्याचे सांगितले. सदर तिन्ही आस्थापनांनी भरलेल्या टेंडरची प्रत, टेंडरची वर्तमान पत्रातील जाहीर नोटीस तसेच टेंडर मंजूर केल्याची प्रत सादर करण्यास सुचित केले असता, पुढील सुनावणीस सादर करणार असल्याचे सांगितले. तथापी, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलल्या याचिकेमध्ये जप्त साठ्याचे वितरण करावयाच्या शिल्लक असल्याबाबत सदर तिन्ही आस्थापनांपैकी मे. श्री हरी इंटरनॅशनल या कंपनीचा उल्लेख नसल्याची बाब उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली असता, त्यांनी सदर बाबतचे तपशिल पुढील सुनावणीस सादर करणार असल्याचे सांगितले.

सुनावणीस उपस्थित सर्व संबंधितांना त्यांनी या कार्यालयास अवगत न करता तसेच आदेशामधील नमूद बाबींची पुर्तता न करता जप्त कडधान्यांच्या साठ्याचे उचल करण्यासाठी त्यांनी घेतलेला निर्णय हा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारीत केलेल्या आदेशाचे अवमान असल्याची बाब उपस्थितांना निदर्शनास आणून दिली. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे जप्त साठ्याच्या उचलिस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या अधिकाऱ्यांनी त्यांची मान्यता अथवा त्यांना अवगत केले किंवा कसे, याचा बोध होत नाही.

सबब, वरील नमूद बाबींची पूर्तता करुन घेण्यासाठी तसेच मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या अधिकाऱ्यांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०४/०२/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

सदर सुनावणीस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे उपमहाव्यवस्थापक श्री. मधुसुदन, मॅनेजर मार्केटिंग श्री. पी.बी. मालदे, सहाय्यक व्यवस्थापक श्री. हर्षद दळणे यांनी उपस्थित राहून लेखी निवेदन सादर केले. दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस माहे डिसेंबर, २०१२ या महिन्यात जप्त कडधान्याच्या साठ्याची या कार्यालयास अवगत न करता विक्री केल्याची बाब उपस्थित अधिकाऱ्यांना आणून दिली व सदर निर्णयाची प्रत अथवा त्या संबंधितील निर्णय घेणारे अधिकारी यांच्याबाबत माहिती मागितली असता, सदर बाब ही त्यांच्या कार्यालयाची अंतर्गत बाब असल्याचे सांगून सदर निर्णयाबाबतचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सुनावणीस सादर



CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

केले नाही. तथापी, तिन्ही कंपन्यांना जप्त कडधान्यांचा साठा विक्री करण्याचा निर्णय हा सामुहीकरित्या घेतल्याचे सांगून सदर निर्णयामध्ये मार्केटिंग विभाग, लिगल विभाग, फायनान्स विभाग, शाखा प्रबंधक तसेच नवी दिल्ली येथील कॉर्पोरेट ऑफिस (मुख्य कार्यालय) या सर्वांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांनी सामूहिक निर्णय घेऊन जप्त कडधान्यांची विक्री केली आहे व सदर निर्णय मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशाच्या अनुषंगानें घेतल्याचे सांगितले.

तद्नंतर मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीच्या उपस्थित अधिकाऱ्यांना त्यांच्या दिनांक २३/११/२०१२ रोजीच्या पत्रामधील शेवटचे परिच्छेद निदर्शनास आणून दिले. सदर परिच्छेदामध्ये, " You are humbly requested to issue necessary instructions to the concerned authorities accordingly. " असे नमूद आहे. तथापी, मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांनी या कार्यालयास अवगत न करता अथवा संमती न घेता साठा विक्री केल्याची बाब निदर्शनास आणून दिली. सदर बाब त्यांच्या कार्यालयाने घेतलेल्या सामुहिक निर्णयानुसार विक्री केल्याचे सांगितले आहे. सदरची बाब ही मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक १९/११/२०१२ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अवमानना झाल्याची बाब उपस्थितांना निदर्शनास आणून दिली.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखुन ठेवण्यात आले.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २९/०३/२०१२ रोजीच्या तपासणीमध्ये काळे उडीद या कडधान्याचा २३४.१०० मे.टन, मसुर या कडधान्याचा ५७५.२०० मे.टन व हिरवे मुग या कडधान्याचा ४८५.००० मे.टन साठा जप्त करण्यात आला. मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीच्या मुंबई शाखेतील संबंधीत अधिकाऱ्यांनी यापुर्वीच्या म्हणजेच तपासणी नंतरच्या सुनावणीच्या पहिल्या टप्प्यामध्ये सादर केलेल्या बिल ऑफ लेडिंग/बिल ऑफ एन्ट्री तसेच विविध राज्यांना सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत करण्यासाठी प्रलंबित असलेले वितरण आदेशांचे अवलोकन केले. तपासणीचे वेळी जप्त केलेला काळे उडीद या कडधान्याचा २३४.१०० मे टन साठा हा वितरण आदेश क्र. ३३ दिनांक २८/०३/२०१२ अन्वये हिमाचल प्रदेश, राज्य नागरी पुरवठा विभागास वितरीत करावयाचा असल्याचे दिसुन आले. मसुर या कडधान्याच्या ५७५.२०० मे.टन साठ्यापैकी वितरण आदेश क्र. ९३ अन्वये वितरीत करावयाचा २००.००० मे. टन साठा वजा जाता घटनास्थळी ३७५.२०० मे. टन साठा हा अतिरिक्त असल्याचे दिसुन आले. तसेच हिरवे मुग या कडधान्याच्या ४८५.००० मे.टन साठ्यापैकी वितरण आदेश क्र. २४ अन्वये वितरीत झालेला ५०.००० मे. टन व वितरण आदेश क्र. २५ अन्वये वितरीत करावायचा १००.००० मे. टन साठा तसेच आयात केलेल्या साठ्यापैकी शिल्लक असलेला १५०.१५६ मे.टन साठा वगळता उर्वरीत १८४.८४४ मे.



DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FFICE

टन साठा हा अतिरिक्त आढळून आल्याचे दिसुन आले. सबब, काळे उडीद या कडधान्याचा २३४.१०० मे.टन, मसुर या कडधान्याचा २००.००० मे.टन व हिरवे मुग या कडधान्याचा ३००.१५६ मे.टन साठा हा मे. स्टेट ट्रेडींग कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीस प्रलंबित दर्शविण्यात आलेल्या वितरण आदेशानुसार परत करण्यात आला व उर्वरित अतिरिक्त आढळुन आलेला मसुर या कडधान्याचा ३७५.२०० मे.टन व हिरवे मुग या कडधान्याचा १८४.८४४ मे.टन साठा हा जप्त करण्यात आला आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देशित केल्यानुसार सदर प्रकरणी नव्याने सुनावणीची प्रक्रिया सुरु करण्यात आली. सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे. मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे कडधान्य विभागातील संबंधित अधिकारी यांनी विविध सबबी सांगुन सुनावणीची प्रक्रिया लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न केला. तथापी, या कार्यालयाने सर्व संबंधितांना त्यांनी केलेल्या मागणीनुसार व सोयीनुसार सुनावणीस पाचारण करुन त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी दिली आहे. मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी जप्त असलेल्या मसुर व हिरवे मुग या कडधान्याच्या साठ्याची उचल करुन विक्री केल्याची बाब सुनावणीच्या अंतिम टप्प्यात या कार्यालयाच्या निदर्शनास आणुन दिली ही आश्चर्यजनक बाब आहे. दिनांक २९/०३/२०१२ रोजी या कार्यालयाकडून जप्त केलेल्या साठ्यांबाबत मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांनी या कार्यालयास असे निदर्शनास आणुन दिले की, त्यांचा विविध गोदामात साठवणुक असलेला कडधान्याचा साठा हा विविध राज्यांच्या मागणीनुसार सार्वजनिक वितरण प्रणालीवर अनुदानीत दराने वितरीत करावयाचा साठा आहे. परंतु, या प्रकरणी जप्त असलेला साठा मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांनी सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरणासाठी न देता तो संपूर्ण साठा खाजगी व्यापाऱ्यांना विक्री केल्याचे दिसुन येते.

मे. स्टेट ट्रेडींग कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीस त्यांचा अभिलेखावरील वैध असलेला म्हणजेच प्रलंबित वितरण आदेशानुसार साठा हा त्यांना यापूर्वीच परत करण्यात आला आहे. म्हणजेच नमूद गोदामात उर्वरीत शिल्लक व जप्त असलेला साठा हा अतिरिक्त असल्याचे निष्पन्न झाले आहे. वास्तविक पाहता मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेली जबाबदारी कसोशीने पार पाडणे अपेक्षित होते. तथापी, नमूद गोदामात साठवणूक केलेल्या साठ्यामधुन वितरीत झालेला साठा वजा जाता शिल्लक असणे अपेक्षित असलेल्या साठ्यापेक्षा अतिरिक्त साठा आढळुन आल्याचे दिसुन येते, ही बाब गंभीर आहे. मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांनी गोदाम मालक तसेच कस्टम हाऊस एजंट यांच्याशी संगनमत करुन विविध राज्यांना सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत करण्यासाठी निर्गमित केलेल्या वितरण आदेशामधील नमूद परिमाणानुसार संबंधित राज्यांना वितरण न करता तो कमी प्रमाणात वितरण करुन संबंधित राज्यांची घोर फसवणूक केल्याचे सिद्ध होत आहे. यावरुन नमूद गोदामात अतिरिक्त आढळुन आलेला मसुर व हिरवे मुग या कडधान्याचा साठा हा सर्व संबंधितांनी संगनमत करुन काळ्याबाजारीने विक्री करण्याच्या उद्देशाने अवैध साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, अतिरिक्त आढळुन

आलेला मसुर या कडधान्याचा ३७५.२०० मे.टन व हिरवे मुग या कडधान्याचा १८४.८४४ मे.टन साठा हा यापुर्वी दिनांक ३०/०४/२०१२ रोजी पारित केलेले आदेश कायम करुन शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ९४६१/२०१२ अन्वये दिनांक १९/११/२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशामधील अनु.क्र. १०(iii) अन्वये " The petitioners are at liberty to dispose of the stock in accordance with law. The petitioners undertaking to pay the money to or as per the directions of respondent Nos. 1 and 2, if so held finally, is accepted. They further undertake to pay interest, if any, in accordance with law. Respondent Nos. 1 and 2 are at liberty to make an application for the same by an interim application even in this dispose of writ petition. Such application, needless to add, shall be decided in accordance with law." असे नमुद आहे.

तथापी, मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या कडधान्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या उपरोक्त आदेशाचे पालन केल्याचे दिसुन येत नाही. सदर प्रकरणी या कार्यालयाकडून जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये सुनावणीची नव्याने प्रक्रिया सुरु होत असताना मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांनी या कार्यालयास अवगत न करता व परवानगी न घेता परस्पर नमूद गोदामातील जप्त मसुर व हिरवे मुग या कडधान्यांच्या साठ्याची उचल करुन विक्री केल्याचे दिसुन येते. सद्यस्थितीत जप्त मुद्देमालाचे आदेश पारित करताना जप्त मुद्देमाल हे शिल्लक नसल्याचे दिसुन येते. सबब, मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने शासनजमा करण्यात आलेल्या मसुर व हिरवे मुग या कडधान्याच्या साठ्याची विक्री केली असल्याने जप्त मुद्देमालाच्या विक्री पोटी त्यांच्याकडे जमा झालेली रक्कम शासनास भरणा करण्याचे आदेश पारित करण्यात येत आहेत.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०३९/२०१२ दिनांक १२/०४/२०१२ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मसुर या कडधान्याचा ३७५.२०० मे.टन व हिरवे मुग या कडधान्याचा १८४.८४४ मे.टन अतिरिक्त आढळुन आलेला संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेल्या कडधान्याच्या साठ्याची मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने विक्री केली असल्याने जप्त मुद्देमालाच्या विक्री पोटी त्यांच्याकडे जमा झालेली रक्कम शासनास भरणा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची रक्कम पोलिसांनी मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि: यांचेकडुन प्राप्त करुन येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक
२) मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे व्यवस्थापक
३) मे. एस. रामदास प्रागजीचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांना माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.